# मुंबई मेट्रो ३ची ट्रायल रन आज

**मुंबई** : मुंबई मेट्रो ३ची ट्रायल रन उद्या मंगळवारी होणार आहे. या ट्रायल रनला हिरवा झेंडा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दाखविणार आहेत. ही ट्रायल रन सारिपूत नगर ते मरोळ नाका स्थानकादरम्यानच्या ३ किमी लांबीच्या बोगद्याच्या आत घेण्यात येणार आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, तात्पुरत्या सुविधा क्षेत्रापासून सुरू होणाऱ्या बोगद्यांमध्ये या चाचण्या घेतल्या जातील.